**॥ श्री ॥**

**॥ बाबा ॥**

जयजय ढुंढीराजा तु मंगलमूर्ति
तुझीया दर्शने मज मिळे वि.ती ॥धृ॥

ढुंढीराजा गणपती मंगलमुर्ति
प्रथमेश्वर ऊंकार स्वरुप ब्रहमस्थिती
विघागणपती दाता वैभव,कीर्ती
ढुंढीराज नामे तुजला आणि भजिती ॥1॥

निर्गुण स्वरुप तुझे आदि ओंकारा
ब्रहमा विष्णु रुद्र तुझीया आकारा
भक्तांसाठी घेसी सगुण अवतारा
आम्हा साठी होशी तु ज्येष्ठ भ्रातारा ॥2॥

गजमुख सगुण रुपी तुझे लंबोदरध्यान
विशालकाया आपुली चरण युगुलातन
भक्तांसाठी निरंतर तुझे अवधान
भक्त संकटी पडता येशी धावुन ॥3॥

ढुंढीराज नामे भावे तुज पुजिला
कायावाचा मनसे ध्यानी चिंतीयला
अंतरीचा तु आत्मा गणेश मम गमला
बाबा कृपाप्रसादे आम्हा सापडला ॥4॥

★★★★★